पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : २८ • मार्च २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## कामगार प्रशिक्षण वर्गाची यशस्वी सहल

सल्लागार (कामगार) कार्यालया कडून आयोजित केलेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग क्र.८३ व ८४ ची शैक्षणिक सहल दि.३ ते १३ मार्च २०१३ अखेर आयोजित केली होती. वर्ग क्र.८३ हा चतुर्थश्रेणी सेवकांसाठी व वर्ग क्र.८४ हा तृतीयश्रेणी करून संबंधित महापालिकेची माहिती दिली. जोधपूर नगरनिगमला दि ५/३/१३ रोजी दिलेल्या भेटीमध्ये महापौर मा.रामेश्वरजी दाधीय व मा.आयुक्त श्री.ओ.पी.जैन यांची प्रत्यक्ष भेट घेतली व कार्यालय अधिक्षक श्री.धर्मदास भिल यांनी विविध खात्यांविषयी



सेवकांसाठी घेण्यात आला होता. वर्ग क्र.८३ मध्ये २० सेवक तर वर्ग क्र.८४ मध्ये २७ सेवक सहभागी झाले होते. या वर्गाबरोबर श्री.मधुकर बिबवे व श्रीमती उषा आल्हाट हे दोन वर्गशिक्षक होते. या सहलीमध्ये जोधपूर, जैसलमेर, जयपूर, अजमेर, पुष्कर, उदयपूर, अहमदाबाद अशा शहरांना भेटी दिल्या.

सदरच्या शैक्षणिक सहली दरम्यान जोधपूर नगरनिगम व उदयपूर या दोन महापालिकांना भेटी देण्यात आल्या. या भेटीच्या दरम्यान महापालिके तर्फे राबविण्यात येणारे विविध वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प, दैनंदिन कामकाज, नागरी सुविधा पुरविण्याबाबत करण्यात आलेले नवीन व अद्ययावत उपक्रम व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या उपाययोजना यांची सविस्तर माहिती संबंधित अधिकारी/पदाधिकारी यांचेशी सुसंवाद साधून घेतली. वरील दोन महानगरपालिकेतील अधिकारी/पदाधिकारी यांनी प्रशिक्षणार्थीचे स्वागत व आदरातिथ्य माहिती दिली. उदयपूर नगरपालिका येथील मा.नगर अभियंता श्री.शशिकांत वार्ष्णेव यांची प्रत्यक्ष भेट घेवून येथील कामकाजाविषयी माहिती घेतली. म्युनिसिपल संघाचे अध्यक्ष श्री.सोमेश्वर मी.णा. यांची भेट घेण्यात आली.

प्रशिक्षण वर्गासाठी व शैक्षणिक सहलीच्या आयोजनामध्ये समन्वयक मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, वर्गशिक्षक व पंचकमिटी सदस्यांनी वेळोवेळी विशेष मदत केली आहे. विशेषत: या सहलीमध्ये वर्गप्रतिनिधी श्री. पांडुरंग महाडिक, श्री. दिपक माळी, श्री. शिवाजी गायकवाड, श्रीमती सुचेता महाबळेश्वरकर, श्रीमती अनुजा परब यांनी उत्स्फुर्तपणे प्रत्येकवेळी सहकार्य केल्याने सहल यशस्वी होवू शकली. या सर्व शैक्षणिक उपक्रमाच्या मागे मा.सल्लागार (कामगार) श्री. शिवाजी दौंडकर यांनी वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व पाठिंब्यामुळे प्रशिक्षणार्थीना उत्तम प्रकारचे प्रशिक्षण व शैक्षणिक सहलीचा मनापासून अनुभव व आनंद घेता आला, असे सर्व प्रशिक्षणार्थीनी नमूद केले.

## पुणे मनपातर्फे वस्ताद हरिश्चंद्र बिराजदार पुरस्कार २०१३ प्रदान



पुणे मनपातर्फे दि.३०/३/१३ रोजी दु.३ वा. श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे वस्ताद हरिश्चंद्र बिराजदार पुरस्कार २०१३ चे वितरण मा. महापौर यांचे हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमात पुणे मनपातील श्रीमती विद्या शिरस (शिवछत्रपती पारितोषिक विजेती व आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग खेळाडू), श्रीमती सोनाली गारगोटे (आंतरराष्ट्रीय धावपटू) व श्रीमती अश्विनी जागडे (राष्ट्रीय तायक्वोंदो खेळाडू) या खेळाडू कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

पुरस्कारांतर्गत रु.२५००० व मानचिन्ह देण्यात आले.कार्यक्रमास मा.वैशाली बनकर, महापौर, मा.दिपक मानकर, उपमहापौर, मा.वंदना चव्हाण, खासदार, मा.रमेश बागवे, आमदार, मा. विशाल तांबे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. बाबूराव चांदेरे, नगरसेवक, मा.अविनश बागवे, अध्यक्ष, क्रीडा समिती उपस्थित होते.

## पुणे महानगरपालिकेत जागतिक महिला दिन उत्साहाने साजरा

पुणे मनपातर्फे ८ मार्च, २०१३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे दु.३ वाजता महिलांसाठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मा. ॲड. असिम सरोदे उपस्थित होते. कार्यक्रमास मा.उल्का कळसकर, मुख्य लेखापाल, मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार(कामगार), मा.मंजुषा इधाटे, म्युनिसिपल प्रॉसिक्युटर, मा.निशा चव्हाण, ज्युनि.लिगल असिस्टंट, मा.वैशाली जाधव, सहा.आरोग्य प्रमुख, मा.संध्या गागरे, क्षेत्रीय अधिकारी, मा.अंजली साबणे, उप आरोग्य प्रमुख, मा.नितीन केंजळे, कामगार कल्याणाधिकारी, मा.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन व युनियनचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

सुरवातीस मा.सल्लागार (कामगार) यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ व शॉल देवून स्वागत केले. तदनंतर सर्व महिला अधिकाऱ्यांचा व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. तदनंतर महिला सेविका श्रीमती वर्षा मोरे यांनी महिला दिनाचे महत्व व तो साजरा करण्यामागची पार्श्वभूमी सांगितली.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन २०१२-१३ मध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिला कर्मचाऱ्यांना स्मृतिचिन्हे देवून सन्मानित करण्यात आले. यामध्ये श्रीमती सुप्रिया कणबरकर, श्रीमती वर्षा मगदुम, श्रीमती रतनबाई धिमधिमे, श्रीमती प्रमिला दळवी, श्रीमती सविता पारधे, श्रीमती मिना खवले या महिलांना गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त झाला आहे. श्रीमती विद्या शिरस यांनी आंतरकचेरी १०० मि.धावणे स्पर्धेमध्ये सुवर्ण व गोळाफेक स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले. श्रीमती सोनाली गारगोटे यांनी आंतरकचेरी १०० मि.धावणे व गोळाफेक स्पर्धेत रौप्य पदक पटकाविले आहे. श्रीमती नंदा पुराणिक यांना होमगार्डमध्ये केलेल्या उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार मिळालेला आहे.श्रीमती संगिता कोकाटे, शिवछत्रपती पुरस्कार विजेती यांना पिंपरी व चिंचवड महानगरपालिकेतर्फे तेजस्विनी पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचातर्फे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभागाबद्दल तसेच स्त्री संघटना औद्योगिक सहकारी मंडळ यांचेमार्फत आयोजित पथनाट्य स्पर्धेत "मुलगी झाली हो" या पथनाट्यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून यामध्ये श्रीमती रश्मी सोरटे, श्रीमती राधिका जगताप, श्रीमती रसिका निघुट, श्रीमती वर्षा मोरे, श्रीमती माधुरी गोडे, श्रीमती सुप्रिया परदेशी, श्रीमती लिनता जगताप, श्रीमती सुलभा चोपडे या सेविकांनी सहभाग घेतला होता. या सर्व महिला सेविकांचा सत्कार करण्यात आला.

सत्कारानंतर मा. मंजुषा इधाटे यांनी उपस्थित महिलांना प्रथमत: जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर त्यांनी उपस्थित महिलांना कायदेविषयक मार्गदर्शन केले. महिला दैनंदिन जीवनात अनेक भूमिका उत्तमरित्या पार पाडत असते. ती मुलगी, पत्नी, बहिण, आई, मैत्रीण अशा प्रत्येक भूमिकेत तितकीच समरस होवून जाते. महिला शक्ती विविध क्षेत्रात यशस्वी होत असूनही त्यांना पुरेशा प्रमाणात संधी व प्रतिष्ठा मिळत नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शासन स्तरावर महिलांकरिता विविध योजना व कार्यक्रम घोषित केले जातात. यापेक्षा महिलांना सर्व क्षेत्रात संधी देवून त्यांच्या क्षमतावृध्दीला प्रतिष्ठा देणे आवश्यक असल्याचे त्यांनी देण्यात येते ही खरोखरच उल्लेखनीय बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. आजची महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहे, ही जरी कौतुकाची बाब असली तरी महिला खरोखर सबला आहे का, सुरक्षित आहे का, हे अनुत्तरीतच आहे. आज भारतामध्ये लोकशाही अर्थव्यवस्थेत महिलांना ५०% आरक्षण प्राप्त झाले आहे. तथापि, पुरुषांप्रमाणे महिलांना रात्री स्वतंत्रपणे फिरता येत नाही. त्यामुळे महिलांना हा अधिकार पूर्णत: प्राप्त झालेला आहे का? आजही मतदान करताना महिलांना स्वत:च्या इच्छेप्रमाणे मत नोंदविता येत नाही. त्यांचे पती सांगतील त्या उमेदवारांना त्यांना मतदान करावे लागते. याला पूर्ण



सांगितले. हल्ली प्रत्येक क्षेत्रामध्ये भारतीय महिलांनी आघाडी घेतली असून, हक्क प्राप्तीसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृतीची गरज असल्याबाबत सांगितले. याबाबत त्यांनी कायदेविषयक उदाहरणे देवून महिलांना मार्गदर्शन केले.

मा. उल्का कळसकर यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सांगितले की आजच्या समाजात स्त्री खरोखर सुरक्षित आहे का? सध्या सार्वजनिक ठिकाणी महिलांवरील अत्याचार, बलात्कार, विनयभंग यांचे प्रमाण वाढले आहे. लहान मुलींपासून वृध्द महिलांपर्यंत सर्वांना असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. हे सर्व रोखण्यासाठी महिलांनी खंबीर होणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रथमत: मानसिकरित्या महिला कणखर होणे आवश्यक आहे. आजची महिला उच्चशिक्षित असून, प्रत्येक क्षेत्रामध्ये तिने भरारी घेतली आहे. अनेक कठिण परिस्थितीतून काही महिलांनी गरुडझेप घेतली आहे. याबद्दल त्यांनी सर्व महिलांचे अभिनंदन केले व महिलांनी त्यांच्यावरील अन्याय व अत्याचाराविरुध्द प्रतिकार करायला पाहिजे, आवाज उठवला पाहिजे असे आवाहन केले.

मा. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये सर्वप्रथम जागतिक महिला दिनानिमित्त उपस्थित सर्व महिलांचे अभिनंदन केले. पुणे मनपामध्ये अशा प्रकारे महिला दिन साजरा केला जातो, महिलांच्या विशेष कार्याची, त्यांच्यामधील कलागुणांची दखल घेवून त्यांना संधी देण्यात येते, प्रोत्साहन स्वातंत्र्य म्हणता येणार नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. हुंडाबळीचे प्रकार आजही ऐकण्यात येतात. ही अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. महिलांनी स्वत:ला खंबीर करण्याची अत्यंत गरज आहे. बऱ्याचदा महिलाच महिलांना असमानतेची वागणूक देतात, महिलाच महिलांचा छळ करतात. हे प्रकार थांबले पाहिजेत. सासू-सुनेचे नाते हे आई मुलीसारखे होण्यासाठी महिलांनीच प्रयत्न करायला हवा. महिलांनी एकमेकींची टिका करत बसण्यापेक्षा एकमेकींना प्रोत्साहन दिले पाहिजे, आधार दिला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. मुलगी कितीही उच्चशिक्षीत असलो तरीही आपला आयुष्याचा जोडीदार ठरविण्याचा हक्क तिला नाही. त्यासाठी खुप संघर्ष करावा लागतो. मत देण्याचा अधिकार महिलांना देण्यात आला असला तरी मन देण्याचा अधिकार अद्याप प्रत्येक स्त्रीला प्राप्त झाला नाही. घरातील वडिलधारी व्यक्ती म्हणतील त्याच व्यक्तीशी मुलीला आजही विवाह करणे भाग पडते. ही परिस्थिती कुठेतरी बदलायला हवी, असे त्यांनी महिलांना आवाहन केले. कायद्याने महिलांना संरक्षण देण्यासाठी केलेल्या विविध तरतुदींविषयी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन केले.

तदनंतर श्री. सुरेश परदेशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती राधिका जगताप यांनी केले.

## कामगार प्रशिक्षण वर्गातील अनुभव

पुणे महानगरपालिकेमध्ये सन १९७६ पासून केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या अखत्यारीतील प्रादेशिक कामगार शिक्षण मंडळ, पुणे यांच्या सहकार्याने कामगार शिक्षण वर्ग ही योजना सुरू आहे. प्रत्येक वर्षी वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांसाठी वर्ग घेतले जातात. सदर कामगार शिक्षण वर्गाचा लाभ पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवेमध्ये एकदाच घेता येतो. पुणे मनपाने कामगार शिक्षण वर्गाच्या राबविलेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग उपक्रमामुळे सर्व संवर्गातील



कामगारांबरोबर प्रशासनाला फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. बिगारी, ड्रायव्हर, शिपाई तसेच आपल्याकडील तांत्रिक व लेखनिकी संवर्गातील सेवकांना वेगवेगळया ठिकाणच्या त्या त्या संवर्गातील सेवकांचा अनुभव येतो, त्यामुळे त्यांचा स्वभाव, सवयी, विचार, काम करण्याच्या पद्धती, यामध्ये निश्चित बदल झालेले दिसून येतात.

कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८३ व ८४ ची सुरवात दि.७/१२/२०१२ रोजी दु.४ वाजता कसबापेठ क्षेत्रिय कार्यालयातील कामगार प्रशिक्षण हॉलमध्ये झाली. वर्ग क्र.८३ साठी श्री.मधुकर बिबवे व वर्ग क्र.८४ साठी श्रीमती उषा आल्हाट यांची कामगार शिक्षक म्हणून तर समन्वयक म्हणून मा.केंजळे नितीन, कामगार कल्याण अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली. प्रमुख पाहुणे श्री.मुकुंदराव गोरे (समर्थ भारत व्यासपीठ)यांनी आपल्या भाषणामध्ये पुणे मनपा तर्फे राबविण्यात येणारा कामगार प्रशिक्षण वर्ग हा उपक्रम स्तुत्य असल्याचे नमूद करुन तो यापुढेही सुरु ठेवणेबाबत सदिच्छा व्यक्त केल्या. मा.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) यांनी आपल्या प्रस्तावनेत प्रशासन कर्मचाऱ्यांना कामगार प्रशिक्षण वर्गासाठी कार्यालयीन वेळेमध्ये सूट देते, आर्थिक खर्च करते याची सर्व प्रशिक्षणार्थींनी दखल घेवून चांगले शिक्षण घेणे व त्याचा सदुपयोग आपल्या दैनंदिन कामकाजामध्ये करणे आवश्यक असल्याचे नमूद करुन सर्वांना शुभेच्छा दिल्या.दि. ११/१२/१२ ते १८/१/१३ अखेर वेगवेगळया विषयांची मार्गदर्शनपर व्याख्याने झाली व दि. १९/१/१३ रोजी दु.४ वाजता परीक्षा घेवून प्रशिक्षण वर्गाचा शेवट झाला. या प्रशिक्षण कालावधीत खालीलप्रमाणे ४ प्रकल्प भेटी दिल्या. दि.२१/१२/१२ रोजी राजीव गांधी ई-लर्निंग स्कूल, सहकारनगर, दि.४/१/१३ रोजी रामटेकडी हडपसर येथील रोकॅम कचरा वीज निर्मिती, दि.५/२/१३ रोजी यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), दि.२३/२/१३ रोजी थिसेन क्रुप इंडिया लि.

या बॅचची शैक्षणिक सहल दि.३ ते १३ मार्च,१३ अखेर राजस्थान (जोधपूर, जैसलमेर, जयपूर, अजमेर, पुष्कर, उदयपूर, अहमदाबाद) येथे गेली होती. या प्रत्येक शहराचे जोधपूर- ब्लूसिटी, जैसलमेर- गोल्डनसिटी, जयपूर- गुलाबी सिटी, पुष्कर- भारतातील ब्रम्हदेवाचे एकमेव मंदिर, उदयपूर- पांढरी सिटी व लेक सिटी असे वैशिष्ट्य आहे.

जोधपूर नगरनिगम येथे दि.५/३/१३ रोजी प्रत्यक्ष भेट दिली. ही एक हेरीटेज वास्तू आहे. महापौर मा.रामेश्वरजी दाधीय व मा.आयुक्त श्री.ओ.पी.जैन यांची प्रत्यक्ष भेट घेतली व कार्यालय अधिक्षक श्री.धर्मदास भिल यांनी विविध खात्यांविषयी माहिती दिली. या नगरपरीषदेत ३००० सेवकसंख्या असून पाच दिवसांचा आठवडा आहे.

ब्लूसिटी म्हणून प्रसिध्द असे जोधपूर शहर समुद्रसपाटीपासून उंच असून सर्वात प्रथम सूर्यकिरणे या शहरावर पडत असल्याने त्यास सनसिटी असेही संबोधले जाते. सध्या तेथे फाईव्ह स्टार हॉटेल दुसऱ्या बाजूस म्युझियम व तिसऱ्या बाजूस स्वत: सध्याचे राजे राहतात. येथील राजाचा जुना (किल्ला) गड मेहरानगड या नावाने प्रसिध्द आहे.

उदयपूर नगरपालिका येथील मा.नगर अभियंता श्री.शशिकांत वार्ष्णेव यांची प्रत्यक्ष भेट घेवून येथील कामकाजाविषयी माहिती घेतली. वार्षिक बजेट २०० कोटींचे आहे. १८०० सेवकसंख्या असून ५ दिवसांचा आठवडा आहे. म्युनिसिपल संघाचे अध्यक्ष श्री.सोमेश्वर मी.णा. यांची भेट या शैक्षणिक दौऱ्यादरम्यात घेण्यात आली.

उदयपूर शहराला लेक सिटी (तळ्यांचे शहर) व झिंक सिटी (धातूचे उत्पादन करणारे शहर) असे संबोधले जाते. या ठिकाणी लढताना शहिद झालेल्या महाराणा प्रताप यांचा घोडा चेतक याचा तीन पायांवर उभा असलेला पुतळा आहे.

राजा जयसरने सन ११५६ मध्ये उंच डोंगरावर बांधलेला सोनार किल्ला जैसलमेर या ठिकाणी प्रसिध्द आहे. या किल्लयाच्या बांधकामामुळे या शहराचे नाव जैसलमेर असे पडले.

रेगिस्थान दर्शनामुळे वेगळा अनुभव आम्हा सर्वांना मिळाला. तसेच सूर्यास्तानंतर तंबूमधील लोकसंगीत व लोकनृत्याचा आनंद घेतला.

भारतामध्ये ब्रम्हदेवाचे एकमेव मंदिर असलेले पुष्कर शहर प्रेक्षणिय स्थळे व तळे यासाठीही प्रसिध्द आहे. ८ मार्च हा जागतिक महिला दिन असल्याने राजस्थान सरकारने त्या दिवशी सर्व महिलांना सरकारी बसेसने मोफत प्रवासास मुभा असल्याने महिलांनी देवदर्शनासाठी गर्दी केली होती.

सन १७२७ मध्ये राजा सवाई जयसिंग याने ही नगरी वसविल्याने त्यास जयपूर असे नाव पडले. जयपूरमध्ये न्यूसिटी एरिया व ओल्डसिटी एरिया असे दोन भाग आहेत. न्यूसिटी एरियामध्ये राजधानीचे शहर असल्याने भव्य असे विधानभवन असून त्याच्या आजूबाजूच्या ३ किमी.परीसरात सेन्ट्रल पार्क तयार केले आहे. भव्य असे बिर्ला मंदिर, अंबड पॅलेस, म्युझियम, चिडियाघर अशी ठिकाणे आहेत. ओल्ड सिटी एरिया म्हणजे जूने जयपूर शहर. हे गुलाबी शहराचे साक्ष आहे. हवामहल सिटी पॅलेस, जंतर मंतर,राजा सवाई जयसिंग यांचा नहारगड अशी महत्वाची ठिकाणे येथे आहेत.

अरवली पर्वताच्या कुशीत वसलेल्या अजमेरला नैसर्गिक सौंदर्य लाभले आहे. अजमेर येथील दरगाह शरीफ हा दर्गा प्रसिध्द आहे.

अहमदाबादमधील अक्षरधाम मंदीर, भगवान स्वामी नारायण यांची भव्य मुर्ती, लेझर शो इ.ठिकाणी भेटी दिल्या अतिरेक्यांच्या हल्ल्यानंतरची काटेकोर सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता व टापटीप वाखणण्यासारखी आहे. साबरमती नदीकाठी महात्मा गांधींच्या पदस्पर्शाने व वास्तव्याने पावन झालेला व मागील शतकांचा इतिहास सांगणारा व स्वत: साक्ष असणारा साबरमती आश्रम हे अहमदाबादचे प्रमुख आकर्षण आहे.

सदर कामगार शिक्षण वर्गाचा लाभ पुणे मनपाच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या संपूर्ण सेवेमध्ये एकदाच घेता येतो. तो योग मला सल्लागार (कामगार) कार्यालयात बढतीने सरलेखनिक या पदावर आले असता आला. एकूण ४७ प्रशिक्षणार्थी व २ पर्यवेक्षकांसमवेत १० दिवसांच्या कालावधीत शैक्षणिक सहल अत्यंत उत्साहाच्या व खेळीमेळीच्या वातावरणात व सर्वांच्या सहकार्याने पार पडली.

**सौ.सुचेता महाबळेश्वरकर**
**सरलेखनिक,**
**सल्लागार (कामगार) कार्यालय,**

## सहल....... एक शोध व बोध

क्रांती झिंदाबाद रहेगी।
क्रांती झिंदाबाद।
मरणाच्या दारात घातली।
आम्ही तुम्हाला साद।।

प्रशिक्षण वर्गात या बिबवेसरांच्या क्रांतीगीताने रक्त सळसळते, नवा उत्साह निर्माण होतो, अंतर्गत प्रेरणा मिळते. जी आंतरिक सुप्त शक्ती आहे, जिच्या संपर्कामुळे जीवन बलशाली बनते, आम्हा सर्व प्रशिक्षणार्थींना पुढील भविष्यकाळ उज्वल करण्यासाठी या क्रांतीची प्रगतीची बदलाची ज्योत पुढे चालवायची आहे. या प्रशिक्षणाचा उपयोग "वरं जनहितं ध्येयम्" या बोधवाक्यानुसार करण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. मनात चांगला विचार आणल्यास सकारात्मक बदल घडवू शकतो, याची जाण या प्रशिक्षण व सहलीच्या माध्यमातून येते.

ज्या हिंदवी स्वराज्याची स्थापना या पुण्यनगरीतून झाली अशी ही भूमी शिवरायांची भूमी आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. भक्ती, शक्ती, युक्ती यांचा त्रिवेणी संगम याच भूमीवर झाला आहे. शिवरायांच्या विचारांचा प्रभाव या पुण्यनगरीत आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक असणाऱ्या शिवरायांच्या विचाराने प्रभावित होवून अनेक क्रांतीवीर या भूमीमध्ये निर्माण झाले व पुण्याचे नाव जगभर पसरले. म्हणजेच पं.नेहरुंनी म्हटल्याप्रमाणे भविष्याची पावले ओळखण्यासाठी व वर्तमान समजण्यासाठी इतिहासाचा अभ्यास महत्वाचा आहे.

कामगार शिक्षण वर्गातील बॅच क्र. ८३ व ८४ च्या सहलीच्या अभ्यासामुळे इतिहासाची साक्ष पटते. जोधपूर, जयपूर, उदयपूर या ठिकाणी राजांची परंपरा अस्तित्वात आहे. त्यांचे वारस आजही तेथील राजे आहेत. परंतु या सर्वांपेक्षा पुण्याचे स्थान आगळे वेगळे आहे. परिपक्व विचारसरणीचा प्रभाव येथे आहे. पुणे ही देशाची सांस्कृतिक व शैक्षणिक राजधानी आहे. तसेच, सह्याद्रीच्या कुशीत असल्याने निसर्गाचा वरदहस्त लाभला आहे.

महापालिका स्तरावरील सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन गॅसनिर्मिती व तो गॅस जनरेटरला जोडून त्यापासून वीजनिर्मिती असा हा मनपाने राबविलेला देशातील एकमेव वीजप्रकल्प पुणे मनपाचा आहे.

अशाच पध्दतीचा राजीव गांधी ई लर्निंग स्कुल हा ज्युनिअर के.जी. ते आय.आय.टी.पर्यंतचा बॅगलेस पध्दतीचा, स्क्रीनवर टिचिंग केला जाणारा अभ्यासक्रम येथे आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्तरावरील हा पहिलाच पायलट प्रोजेक्ट आहे. त्याचप्रमाणे पुण्याचा मुबलक, स्वच्छ, शुध्द पाणीपुरवठा हा भारतातील एक नंबरचा प्रकल्प आहे. शिक्षणाचे माहेरघर असणारे पुणे विद्यापीठ तसेच आय.ए.एस. अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी यशदा सारखी संस्था ही पुण्यामध्ये आहे. महानगरपालिका प्रशासन राज्य शासनाकडे जे अभिप्राय पाठविते त्यांची अंमलबजावणी राज्यभर होते. उदा. प्रभाग रचना पध्दती (२००२), वॉर्ड रचना



(२००७) म्हणजेच पुण्यात जे निर्माण होते ते राज्यभर चालते, भारतभर खपते.

संत रामदासांनी म्हटल्यानुसार जगी सर्व सुखी असा कोण आहे, याचा शोध घेतला तर सापडतो तो पुणेकर .... फक्त पुणेकर..... पण कधी अंतर्मनाने विचार केला तर. कारण, सुखी माणसांचा सदरा शिवरायांनी रायगडावर जाताना पुण्यनगरीतच ठेवलेला आहे. आपल्या अंतर्गमनाला स्मरुण चांगली कृती करा, हातात घेतलेले काम मनापासून करा. त्यामुळे सुख समाधान मिळते.

पुण्याला ऐतिहासिक वारसा लाभला आहे, पुण्याला चांगले संस्कार, चांगली संस्कृती, शिस्त व परंपरा आहे. संस्कार व संस्कृतीमुळे तारतम्यता निर्माण होते, तारतम्य हे सुखाने जगण्याचे एक तंत्र आहे. त्यामुळे कोणत्याही प्रवाहातून वाचता येते. या सर्वांचा उपयोग आम्ही प्रशिक्षणार्थी स्वत:साठी, महानगरपालिकेसाठी व तमाम जनतेसाठी कोणताही स्वार्थ न ठेवता करणार आहोत व पुणे महानगरपालिकेचे नाव आहे त्यापेक्षा जास्त चांगल्या कामाच्या दर्जामुळे जागतिक पातळीवर उंचावण्याचा प्रयत्न करणार आहोत.

**श्री. संजय गोविंदराव खाडे**
**सिनिअर ग्रेड लेखनिक,**
**मुख्यलेखापाल कार्यालय**

# ८ मार्च महिला दिन - १० मार्च सावित्रीबाई फुले स्मृतीदिन

८ मार्च जागतिक महिला दिन आणि १० मार्च सावित्रीबाई फुले स्मृतीदिनानिमित्त सर्व स्त्रियांना मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा.आई,बहिण,पत्नी. मुलगी, सहकारी, सखी, प्रेयसी, इ.महिलांची विविध रुपे.या सर्व भूमिकांना सादर अभिवादन. खरेच स्त्री-महिला हे शब्द उच्चारताच मन कसे अभिमानाने भरुन जाते। यातील एक एक शब्द उच्चारताच त्यातील गर्भितार्थ लक्षात घेण्यासारखा आहे. महिला म-महान, हि-हिंमतवान, ला-लाजरी बुजरी तरीही लाखात एक.

स्त्रियांमध्ये विशेषत्वाने असणारे उपजतच गुण म्हणजे सहनशीलता, सोशिकपणा, समर्पण, चिकाटी, वात्सल्य, प्रेमळ, हळवी, भावूक, जिद्दी, नाजूक आणि सर्वात महत्वाचा म्हणजे तडजोड, सहकार्य आणि समर्पण. स्त्री जरी नाजुक असली तरी वेळप्रसंगी वज्राहूनही कठोर, हिंमतवान, येईल त्या प्रसंगाला समर्थपणे, धीटपणे तोंड देण्याचे सामर्थ्य तिच्यात असतेच. त्याशिवाय का झाशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई, राजमाता जिजाउ, सावित्रीबाई फुले आणि आत्ताच्या काळातही पंतप्रधान राष्ट्रपती हे उच्चपदही स्त्रिया अगदी समर्थपणे पेलतात. अशी अजून कितीतरी उदाहरणे आर्यकाळापासून ते आतापर्यंत सांगता येतील.

स्त्रिया आज समाजात ग्रामपंचायत, विधानसभा ते संसदेपर्यंत लोकप्रतिनिधीत्व करताना दिसून येतात. गोरगरीब, आदिवासी, निराधार महिलांसाठी झटताना दिसून येतात. पण सर्वच स्त्रियांनी आपण समाजाचे काही देणे लागतो याच भावनेने समाजात घडणारे अन्याय, अत्याचार, दु:ख हे माझेच आहे असे समजून सामाजिक कार्यात पुढाकार घेवून खऱ्या अर्थाने सावित्रीबाई फुलेंना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली पाहिजे. सावित्रीबाई फुलेंनी समाजाचा प्रचंड विरोध पत्करुनही स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत जे अग्निदिव्य केले ती एक प्रकारची क्रांती होती. कोणतीही क्रांती ही सहजासहजी होत नसते. त्यासाठी सर्व सुखाचा त्याग फुले उभयतांनी केलेला होता. समाजाचा विरोध, प्रक्षोभ, शेणमारा, दगडवीटांचा मारा सहन केलेला होता. म्हणूनच त्यांना क्रांतीज्योती म्हणतात.

आजही अनेक ठिकाणी विविध क्षेत्रांत महिला आपली कर्तबगारी दाखवित आहेत. आजची सावित्रीही अनेक खडतर प्रवासातून गरुडझेप घेत आहे. हे अभिमानास्पद आहे. म्हणूनच सावित्रीबाईंच्या अथांग परिश्रमांना पूर्णत: मूर्तरुप प्राप्त झाले आहे, असे म्हणावयास हरकत नाही. पण त्याचबरोबर त्यांचे पतीराजे/यजमानही महात्मा फुलेंची भूमिका पार पाडताहेत म्हणून मन:पूर्वक त्यांचेही अभिनंदन करावयास विसरुन चालणार नाही.

आजच्याही सावित्रींना त्याच दिव्यातून जावे लागते. थोडेफार प्रमाण कमीजास्त असेलही, घर-संसार, स्वत:चे करीयर, सामाजिक अडचणी सांभाळून तारेवरची कसरत करावी लागते. फक्त कमी भासते ती फुलेंचीच. महात्मा फुलेंचे एक कार्य म्हणजे, एकदा ते सहज नदीकाठी फिरत असताना त्यांना एक तरुणी हात जोडून जीव देण्याच्या स्थितीत असताना जोतिबा फुलेंनी पाहिली आणि पळत जावून तिला अडविले. कारण विचारता ती म्हणाली मी एक विधवा असून मी गरोदर आहे. मला फसविले गेले. त्या वेळी त्यांनी तिला मुलीप्रमाणे समजून घरी आणले, तिला सांभाळले. मुख्य म्हणजे सावित्रीबाईंनीही त्याला सक्रिय होकार दिला व तिचे बाळंतपण केले. तिला मुलगा झाला. त्याचे नाव यशवंत ठेवले आणि त्यालाच नंतर दत्तक मुलगा म्हणून स्विकारले. कारण या उभयतांना मुलगा नव्हता.

खरे पाहता आजच्या समाजात स्त्री सुरक्षित नाही. तीन वर्षांच्या अजाण बालिकेपासून ते ५५-६० वर्षांच्या महिलेवर अत्याचार, बलात्कार, विनयभंग हे प्रकार सार्वजनिक ठिकाणी राजरोस होतात. ही बाब शिवरायांच्या आणि फुलेंच्या हिंदवी स्वराज्यात घडते, ही एक अत्यंत शोकांतिका आहे. स्त्रीभ्रुणहत्या ही एक अत्यंत गंभीर समस्या समाजात भेडसावत आहे. मुलींचे प्रमाण ही उत्तरोत्तर फार कमी होत आहे.

शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातील शिवराय, म.फुले आणि शाहू महाराजांची उणीव आज भासत आहे. म्हणूनच स्त्रियांनी सावित्री ही सत्यवानाची असो वा ती महात्मा फुलेंची असो तिने सामाजिक रुढीला, तिच्यावरील अन्याय, अत्याचाराविरुध्द प्रतिकार करायला हवा. आवाज उठवायला हवा. सावित्रीचा वसा सावित्रीच्या लेकींनी पुढे चालवायलाच हवा. पुरुषांनीही शिवराय, म.फुले, राजर्षि शाहू महाराज बनून भगिनींच्या पाठीशी उभे राहून प्रोत्साहन दिले पाहिजे. असे म्हटले जाते की, जगात अन्नाच्या भुकेपोटी जेवढे लोक उपाशी मरताहेत त्याच्या कितीतरी पट जास्त संख्येने लोक प्रोत्साहनाच्या व कौतुकाच्या भुकेपोटी उपाशी मरताहेत. म्हणूनच जीवनात प्रोत्साहन मिळणे खूप महत्वाचे आहे.

जोतिरावांच्या क्रांतीकारी समाजसुधारणेच्या कार्याला खरी साथ मिळाली ती त्यांच्या पत्नीची. ती सती सावित्री त्या सत्यवानाशी एकरुप झाली होती. एकरुपता म्हणजे खरी भक्ती असते. जिथे भक्ती नाही ती विभक्ती (वेगळेपणा). जिथे विभक्ती नाही तीच भक्ती. सावित्रीबाईंची पतीभक्ती आदर्श होती. म्हणूनच त्यांनी जोतीरावासमवेत हा काटेरी रस्ता चालताना तसूभरही साथ सोडली नाही. कारण मावळत्या सूर्यापेक्षा उगवत्या सूर्याकडे ते आशेने पाहात होते. अशी आत्म्यापरमात्म्याची एकरुपता त्या काळी कोणालाही लाभली नव्हती. फक्त एकच उदाहरण होते ते जोतीसावित्रीचं. सावित्रीबाईंनी आपल्या आगळ्यावेगळ्या संत पतीच्या कार्याची जोतिबांची ज्योत अखंड प्रज्वलित ठेवली. ऐवढेच नव्हे तर यशवंतला म.फुले यांच्या चितेला यशवंतने अग्नि देणेबाबत घरच्यांनी विरोध केला, तेंव्हा सावित्रीबाईंनी यशवंतच्या हातातील अग्नि घेवून स्वत: म.फुलेंच्या चितेला अग्नि दिला. सर्वांच्या विरोधाला न जुमानता नवऱ्याच्या चितेला अग्नि देणारी ती महाराष्ट्रातील पहिली स्त्री होती.

मानवतेच्या नितीधर्माचा समाजानं दूर सारलेल्या जीवांचा उध्दार, स्त्रियांना शिक्षण, विधवा-परितक्त्या स्त्रियांना आधार, अनाथ, निराधार मुलामुलींसाठी आधार, त्यांचे पालन पोषण या सात्विक समाजकार्याचा ध्वज उंच उभारुन ठेवला. आज म्हणूनच त्यांचा स्मृतीदिन एवढी वर्षे साजरा करतानाही उत्साह भरभरुन ओसंडतो आहे. त्यांच्या आठवणी प्रित्यर्थ म्हणावेसे वाटते की,

थोर महात्म्ये होवून गेले।
चरित्र त्यांचे पाहा जरा।।
आपण त्यांच्या समान व्हावे।
हाचि सापडे बोध खरा।।

मागील इतिहास पाहिला तर स्त्री रावणाची सुवर्णलंका संपविण्यास कारणीभूत ठरली. महाभारत हे स्त्रीमुळेच झाले. स्त्री संख्या कमी झाल्यास याची पुनरावृत्ती होणार नाही का? परंतु नाण्याला दोन बाजू असतात? तशाच या सर्व गोष्टींना स्त्रीला दोषी ठरवून चालणार नाही. ऐतिहासिक शौर्यात स्त्रीचा मोलाचा वाटा आहे. ऐतिहासिक प्रमाणेच आताही लता मंगेशकर, आशा भोसले, सानिया मिर्झा, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स यांनीही मोठी विजयाची शिखरे सर केलीत. हे आपण का विसरतो ? आपलीही मुलगी यापैकी कोणीतरी बनेन. मुलगाच फक्त वंशाचा दिवा आहे मुलगी नाही हा मतप्रवाह बदलला पाहिजे. मुलगा/मुलगी समान मानणे हे जरुरी आहे. मुलगा एक वंशाचा दिवा आहे. पण मुलगी मात्र दोन कुळांना एकत्र जोडून दोन्ही कुळांचा उध्दार करते. पण तरीही मुलांच्या हट्टासाठी मुलींचे गर्भलिंग परिक्षण करुन त्या निष्पाप कळीचा उमलण्याआधीच जीव घेतला जातो. या गुन्ह्यामध्ये कुटूंबकर्त्याचाच सहभाग जास्त असतो. तो ही आपलाच अंश आहे, गर्भपात करतेवेळी याचेही भान राहात नाही. जर मुलगीच नको असाच हट्ट धरला नाही तर भविष्यात आपल्याच वंशाला दिवा मिळण्यासाठी आपल्याला सुनाही मिळणार नाहीत, याचे भान ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ही सामाजिक समस्या होवू नये म्हणून मुलींना जन्म देणे ही सामाजिक गरज आहे.

चला तर आता निश्चय करुया।
स्त्री भ्रूण हत्या थांबवू या।।

जर स्त्री भृण हत्येमुळे समाजातील मुलींचे प्रमाण कमी झाले तर समाजात अनेक प्रश्न निर्माण होतील. सेक्स हा विषय वाढेल, गुन्हे वाढतील, विवाहाचे प्रश्न निर्माण होतील, नैतिक समतोल बिघडेल. हरी-हर, राधा-कृष्ण, मीरा-मोहन, असेच म्हटले जाते. पण आज आईचे नाव दाखल्यात नमूद करण्यासाठी कायदा करावा लागतो ही शोकांतिका आहे. भलेही कोणी म्हणोत की, शिवाजी जन्मला पाहिजे, संभाजी जन्मला पाहिजे, राम, कृष्ण, म.फुले, शाहू महाराज हे जन्मले पाहिजेत पण खऱ्या अर्थाने यांना जन्माला येण्यासाठी प्रथम एक स्त्री/माता म्हणून जन्माला येणे गरजेचे आहे. त्याशिवाय असे थोर पुरुष कसे जन्माला येणार? म्हणून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी समाजात स्त्रीला आदर, मान, सन्मान, मिळण्यासाठी स्त्री-भृण हत्या होवू देणार नाही, स्त्रीला पूर्वीचे गतवैभव मिळवून देण्याचा प्रयत्न करेन. ज्या ठिकाणी स्त्रीयांवरती अन्याय, अत्याचार होईल त्या वेळेला नि:स्पृह वृत्तीने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करेन. तेंव्हाच खऱ्या अर्थाने महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतीदिन साजरा करण्याचा उद्देश सफल होईल.

**अलका जोशी,**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

# ८ मार्च जागतिक महिला दिन

पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे उदाहरण म्हणजे संपूर्ण अमेरिका व युरोपसह जवळजवळ जगभरच्या स्त्रियांना २० व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. न्यूयॉर्क शहरामध्ये कामाचे १० तासांचा दिवस, वेतन व कामाच्या जागी सुरक्षितता, मतदानाचा हक्क यासाठी निदर्शने करण्यात आली. या स्त्री संघटनांनी १९०८ मध्ये केलेल्या निदर्शनाचे परिणाम म्हणजे स्त्रियांसाठी केलेल्या मागण्या मंजूर करण्यात येवून हा ऐतिहासिक दिवस म्हणजेच ८ मार्च जागतिक महिला दिन म्हणून जाहिर करण्यात आला. ८ मार्च, १९०८ रोजी अमेरिकेतील स्त्री कामगारांनी केलेल्या ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ ८ मार्च हा महिला दिन म्हणून क्लाराने १९१० साली कोपनहेगन येथे भरलेल्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला परिषदेत जाहीर करण्यात आला. १९७५ हे वर्ष युनोने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केले. काही देशांमध्ये या दिवशी महिलांसाठी सुट्टी जाहीर केली जाते तर काही ठिकाणी महिलांना फुले, भेटवस्तु, चॉकलेट्स देवून महिलादिन साजरा केला जातो.

भारतामध्ये मुंबई येथे पहिला ८ मार्च हा महिला दिवस १९४३ साली साजरा करण्यात आला. १९७१ सालच्या ८ मार्चला पुण्यामध्ये एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. नुकताच झालेला ८ मार्च २०१३ चा जागतिक महिला दिन जगभर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी महिलांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांना गौरविण्यात येते. प्रत्येक स्त्रीला सभ्यपणे सन्मानाची वागणूक दिली जाते.

चैतन्याचा स्त्रोत तू,
मातृत्वाचा झरा तू,
तू प्रेरणा तू वंदना,
प्रेमाची मूर्तिमंत गाथा तू,
तू संगिनी, तू दुर्गा,
जीवनाला लाभलेली सोनेरी किनार तू.

वरील पंक्तीमध्ये वर्णन केल्याप्रमाणे स्त्रीची नाना रुपे आढळतात. आद्यशक्ती म्हणून स्त्री चे स्थान अढळ आहे. ती कधी माता, कधी पत्नी, कधी बहिण तर कधी मैत्रिण असते. प्रत्येक भूमिका निभावताना ती स्वत: चंदनाप्रमाणे झिजून सुगंध पसरविण्याचा प्रयत्न करीत असते. मा फलेषु कदाचन या तत्वाप्रमाणे कोणत्याही फळाची अपेक्षा न करता ती आपली भूमिका नि:स्वार्थपणे पार पाडत असते. म्हणून स्त्री ला क्षणाची पत्नी व अनंत काळाची माता म्हणतात हे काही खोटे नाही.

भारतीय संस्कृतीत स्त्री ला देवीप्रमाणे मानले जाते. तिला गृहलक्ष्मी म्हणून पूजले जाते. तिचे कधी दुर्गा, सरस्वती, पार्वती म्हणूनही पूजन केले जाते. तर सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक यांनी आपल्या कार्यातून, लिखाणातून स्त्रीविषयी मते समाजापुढे परखडपणे मांडल्याने आज आपल्यासारख्या स्त्रियांना शिक्षण, सतीची चाल, बालविवाह यासारख्या पुरातन रुढींमधून मुक्तता मिळाली. मदर तेरेसांनी प्रेमाचा, मातृत्वाचा संदेश दिला. आजच्या काळात जेथे प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज, किरण बेदी, लता मंगेशकर यासारख्या अनेक स्त्रियांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आज प्रत्येक स्त्री ही चाकोरीच्या बाहेर जावून आपले क्षितिज धुंडाळत आहे. कोणत्याही क्षेत्रात स्त्री कमकुवत नाही. प्रत्येक क्षेत्रात तिने आपला ठसा उमटवला आहे.

बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार स्त्रियांच्या मागण्या बदलत आहेत.

परंतु ८ मार्च हा जागतिक महिला दिन एक दिवस साजरा करण्यापेक्षा आपल्या समाजातील लोकांच्या मानसिकतेत फरक पडणे फार आवश्यक आहे. जोपर्यंत या मानसिकतेत फरक पडत नाही, परस्त्रीला मातेसमान सन्मानाने, सभ्यपणे वागणूक दिली जात नाही तोपर्यंत स्त्री-पुरुष यांना समान मानावे ही शिकवण फक्त कागदावरच राहील. स्वामी विवेकानंदांनी प्रत्येक स्त्रीला मातेचा दर्जा दिला आहे. भारतीय संस्कृतीत जिथे स्त्रिला देवीसमान मानले जाते तिथे आजच्या घडीला आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या भ्रूणहत्या, हुंडाबळी, सूडाने पेटून स्त्रीयांचे होणारे खून, बलात्कार, इ. घटना या कशाचे प्रतिक आहे? या सर्व गोष्टींवरुन असे वाटते महिला दिन एक दिवसच साजरा करणे योग्य आहे का?

याचप्रमाणे वाढत्या तंत्रज्ञानाचा उपयोग जिथे जिव वाचविण्यासाठी होतो तिथेच या तंत्रज्ञानाचा गैरवापर होवून स्त्री-भ्रूण हत्येसाठी याचा वापर केला जातो. आज मुली, स्त्रीया या प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत तरीही काही आईवडिलांना/पालकांना मुली नकोशा वाटतात. यावरुन खालील ओळींची आठवण होते -

कुचलू नका हो या कळ्यांना।
उमलू द्या हो या फुलांना।
जाणूया मर्म या बालिकेचा।
फुलवू या धर्म हा मानवाचा।।

आजच्या काळातही मुलगी म्हणजे खर्च असे समीकरण काही भागांमध्ये आढळते. मुलगी जन्माला आल्यापासून तिच्या हुंड्याची व्यवस्था करावी लागणार असे या पालकांना वाटते. त्यामुळे स्त्रियांना दुय्यम वागणूक ही तिच्या जन्मापासून म्हणजे तिच्या लहानपणापासूनच तिला मिळते. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी यासारख्या बुरसट विचारांमुळे मुलांना लहानपणापासूनच चांगल्या सोयी सुविधा पुरविल्या जातात.

परंतु स्त्री ही दोन घरांची पणती असते. ती माहेरी व सासरी अशी दोन्ही घरे उजळू शकते. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हातभार असतो. प्रत्येक स्त्री ही स्वत:चे अस्तित्व विसरुन कुटुंबासाठी अविरतपणे झिजत असते. अशा प्रत्येक स्त्रीसाठी महिला दिनी गौरवणे आवश्यकच आहे. एक दिवस का होईना प्रत्येक स्त्रीला स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे. कारण मनुष्याची इच्छाशक्ती काही मर्यादेच्या आत का होईना पण स्वतंत्र राहिली पाहिजे. तरच त्या व्यक्तीची मूल्ये विकसित होवू शकतात. आजच्या युगात जिथे जमिनीवरुन नव्हे तर अंतराळातही आपला ठसा उमटवणाऱ्या स्त्री शक्तीला या महिला दिनी आम्हा सर्वांचा सलाम! आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य असलेल्या स्त्री शक्तीला सलाम!

**स्नेहल गुद्देटी**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

# माहे मार्च, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३०/३/१३ रोजी कॅ. वडके हॉल येथे मार्च,१३ मधील सेवानिवृत्त ३६ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये २१ वयपरत्वे व १५ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे जन्मदिवस त्याच महिन्यात येत असल्याने त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. तदनंतर मा.जगताप यांनी मनपाची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांचे



करण्यात आला.प्रमुख पाहुणे म्हणून मा.सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त, घनकचरा व्यवस्थापन तसेच श्री.श्रीरंग राजपाठक, व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम, श्री. मधुकर बिबवे, व्यवस्थापक, पं. नेहरु स्टेडियम हे उपस्थित होते. प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली व आभार मानले व सेवानिवृत्त सेवकांना आपले सेवानिवृत्तीनंतरचे वेळेचे नियोजन करणेबाबत मार्गदर्शन केले. आपल्या सेवानिवृत्तीप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व रकमांची गुंतवणूक चांगल्या ठिकाणी करुन आपले उर्वरित आयुष्य आरोग्यसंपन्न व सुखासमाधानाने व्यतित करण्याबाबत नमूद करुन सर्वांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.त्यानंतर सेवानिवृत सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यकांत चांदेरे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी व आभार प्रदर्शन सौ. सुचेता महाबळेश्वरकर यांनी केले.


कल्याणवार्ता
मार्च, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५२/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## स्त्री – भ्रूण

मातृत्व लाभतांना, आनंद तो काय वर्णावा
परी उदरी कन्यारत्न कळल्यावरी शोक का वाटावा
भूतकाळातील रणांगणा व विदूषी का विसराव्या
स्त्री-भ्रूण हत्या करण्यापूर्वी त्या सर्वांनी आठवाव्या
उदरी करा हो स्त्री-भ्रूण वंशारोपण
बहरेल आणि साजेल तुमचे घर-आंगन
चैत्रवेलीसम वाढवील तव कुळाचा मान
करु नका हो तिच्या जन्माचा अवमान
वंशाचा दिवा दाखवतो बाहेरचा रस्ता
तरीही अट्टाहास मुलाचा का हो धरता?
मुलापेक्षाही सरस असूनी, कमी का समजता
जन्माआधीच ह्या कळ्यांना का हो मारता?
जन्मा येवू द्या पुन्हा लक्ष्मी, इंदिरा, प्रतिभा
पसरुद्यात चहूकडे, तव तेजाची सूर्यासमान
आभा
राखा तुम्ही निसर्गसमतोलाचा गाभा
ममत्वे बोलविल तुम्हा म्हणेन आई-बाबा
नवजीवन देउनी तयांना जगांत या बोलवा
मायेने तिज सांभाळा अन् वाढवा
जन्मा घालूनी स्त्री-भ्रूण जगी मान वाढवा
साक्षर-सक्षम करुनी तिला, मिळवा वाहवा

सौ. अलका जोशी

## हॅलो मी मुलगी बोलतेय

भातुकलीच्या खेळामध्ये
राजा आणि राणी
मुलगीच जन्मली नाहीतर
हा खेळ खेळेल कोणी
हातावर हात धरुन
कसे चालेल बसून
मुलगीच जन्मली नाहीतर
कोठून मिळेल हो सुन
मुलगा मोठा होणार
चांगले शिकणार
मुलगीच जन्मली नाहीतर
त्याचे लग्नच कसे होणार
मुलगा म्हणजे वारस
चालविल पुढची पिढी
मुलगीच जन्मली नाहीतर
चालेल कशी संसाराची गाडी
मुलगी म्हणजे शाप
मुलगी म्हणजे पाप
मुलगीच जन्मली नाहीतर
कसा होशील पुढच्या पिढीत बाप
लग्नाआधी मुलगी होतील
नंतर झालीस आई
अग मी पोटात आहे तर
मलाच मारायची करते घाई
मुलगा म्हणजे वंशाचा दिवा
तर मुलगी म्हणजे दिव्याची वात
वातीशिवाय दिवा पेटणारच नाही
करु नका माझा घात
प्रत्येक भावाला बहिण हवी असते
प्रत्येक मुलाला पत्नी हवी असते
प्रत्येक बाळाला आई हवी असते
ही रुपे बघण्यास मुलगी जन्माला
घालावी लागते
मुलगी म्हणजे धनाची पेटी
तीला सलाम करा कोटी कोटी
ती जर ह्या पृथ्वीवर नसती
तर माणसा तु जन्मला असता
कोणाच्या पोटी
निसर्गाचा समतोल राखा
तो कोणीही तोडू नका
का चाकावर गाडी चालू शकत नाही
हा घातक सिग्नल तोडू नका
एक करा उपकार
मला पृथ्वीवर येवू द्या
सर्वांनी निश्चय करुया
आपल्या घरात एक तरी लक्ष्मी जन्मू द्या
माझा ठेवा मान
जरा राखा भान
मीच देवू शकते बाळ
छान छान छान
एक काळ असा येईल
मुलगी फक्त चित्रात राहील
तेव्हाच माझ्या अस्तित्वाची जाणीव होईल
तेव्हाच तुमच्या डोळ्यातून पाणी येईल.

**श्री.संजय देवळे**

## एक सवाल

पीढी-दर पीढी
सफर मेरा
गंदगी से गंदगी तक
जनम से मौत तक
फिर गंदगी से गंदगी तक
सफर मेरा
पीढी दर पीढी
गंदगी से गंदगी तक
और गंदगी से बदतर
हमारी इस जिंदगी तक
उत्पत्ती-स्थिती-विलय
यह चक्र है जीवन का
विलयके बाद की गंदगी
जिसे मिटाना होगा जरुरी
और जरुरी होगा
तब मेरा अस्तित्व
और होगा शुरु
मेरा सफर
पीढी-दर-पीढी
गंदगी से गंदगी तक
आनेवाली अगली पीढी भी
अब मान चुकी है
समाज मे
अपने अस्तित्व को
और अपना रही है
अपने भाग्य मे लिखे
विधी के विधान को
पढेंगे नही तो (और क्या करेंगे?)
फिर ढोनी होगी
समाज की यह गंदगी
जाने कितनी पीढीयों तक?
पीढी-दर-पीढी सफर मेरा
पिछले दिनों पर्यावरणवादी
थे काफी चिंतित
गिध्दों की तेजी से होती
अकाल मौत को लेकर
और चिंता थी उन्हे
पर्यावरण की शोभा बने
वे खुबसूरत और सुंदर
पशु पक्षी और जीवजंतूओं की
जो सुरक्षित और जीवित है
क्योंकी सृष्टी की इस
गंदगी को मिटाने के लिये
सृष्टी से बनाये यह गिध्द
बडी तेजी से
मर जो रहे थे
परंतु मानवजाती के
इस सभ्य समाज मे
हमारी नासमझी (?)
और हठधर्मिता की
इस गंदगी को मिटाते
पल पल मर रहे हमारे इन
सफाई कर्मीयोंकी जीवजन्तुओंसी
होती मौत को लेकर
हम एक पल भी
चिंतित या लज्जित नही होते
वें तेजीसे मरे?
या घुट घुटकर
अपनी जिंदगी को घसीटते हुए
इस गंदगी को मिटाने का काम
समाज के
इसी घटक को तो करना है
लेकीन क्या हमने कभी
यह सोचा है?
सृष्टी ने इस काम के लिये
गिध्द को जो मजबूती
जो क्षमता प्रदान की है
क्या इतनी शक्ती इतनी क्षमता
इमसे निर्मित इस घटक को
कुदरतने या फिर हमने ही दी है?
गिध्द जिसे व्हल्चर या
स्कॅव्हेंजर कहा जाता है
जो गंदगी को कही ढोकर
खत्म नही करता
अपितु वह जंगल मे मरे
सडे गले जीवों को
अपने पेट मे दफन कर
सृष्टी की गंदगी को
खुद निगल जाता है
सृष्टी का एक
अस्पृश्य जीव स्कॅवेंजर
क्या इन्सान और पशु में
कोई अंतर नहीं ?
क्या मेरा यह सफर
यूंही जारी रहेगा
पीढी-दर-पीढी
गंदगी से गंदगी तक
और गंदगी से बदूतर
हमारी इस जिंदगी तक?
क्या इन मजबूर बेबस
कमीयों की दशा को
देखने के लिये हमारे पास
एक मानवी दृष्टी नही?
इनकी समस्या इनकी जिंदगी को
समझने के लिये
इमारे इस शरीर में
एक संवेदनशील मन नही?

(मेरी यह रचना समर्पित है, उन तमाम सफाई कर्मीयोंके नाम, जिन्होने हमें साफसुथरी जिंदगी देने के लिये खुद अपने प्राणों की आहुति दी है)

**राजदीप बि.धुसिया, उप अभियंता**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

## मर्दानी – झाशीची राणी

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्य सैनिकांना प्रेरणादेणाऱ्या वीर व विरांगनांमध्ये झाशीच्या राणीचं स्थान उच्च आहे.

***शौर्य स्फूर्तीची दत्तचित्त ती मूर्ती चैतन्याची***
***वीर रसाने युक्त, मुक्त ती ललना हो धैर्याची.***

असं तिच्याबद्दल म्हणताना म्हणणाऱ्याचं रक्त सुध्दा सळसळतं. बनारस इथे १८३५ साली मोरोपंत तांबे यांच्या घरी जन्मलेली मनू-मनकर्णिका-जिला छबेली असे कौतुकाने म्हटले जाई, एखाद्या राजकन्येसारखी वाढली. शस्त्र चालविणे, घोड्यावर बसणे या कलांत निपुण झाली. गंगाधरपंतांशी तिचा विवाह झाला तेंव्हा लक्ष्मी असे तिचे नामकरण होवून ४० वर्षांच्या पतीची ती १४ व्या वर्षी राणी झाली. आपल्या प्रजेचे प्रेम आणि आदर मिळवणाऱ्या राणीला बुध्दिमत्ता आणि सौंदर्य याचे वरदान होते. त्या कळात उत्तम लिहिता वाचता येणारी राणी कौतुकाचा विषय होती. उत्तम अश्वारोहण आणि उत्तम अश्वपरीक्षा यात ती पुरुषश्रेष्ठ नानासाहेब पेशवे आणि सयाजी शिंदे यांच्या तोडीस तोड होती. १८५७ च्या लढ्यात तिचा पराक्रम इतका असामान्य होता की, शतकानुशतके लोक तिची पूजा करीत राहतील. झाशीची लढाई, काल्पीची लढाई आणि ग्वाल्हेरची लढाई या तिन्ही लढाया ती मोठ्या तडफेने लढली. आपले संस्थान खालसा करण्याचा, पतीनिधनानंतर आपल्या दत्तकपुत्राचा राज्यावरील हक्क नाकारण्याचा निर्णय तिनं धुडकावून लावला. जी जन्म देते तीच माता? नव्हे जी पालन करते ती माता। राणी युध्दास सज्ज झाली. आपले हितैषी आणि हितशत्रु साऱ्यांना तिनं एकत्र बोलावलं. म्हणाली, आज आपल्या मनात कोणताही वैरभाव नाही. आपले तर आपले पण आज आपले न मानणारेही आपलेच. कारण तुम्ही सर्वच या क्षणी माझे आहात. ही माझी अखेरची लढाई लढायला मी सज्ज झाले आहे. म्हणूनच कदाचित ही आपली अखेरची भेट असू शकेल. आज आईच्या मायेने तुम्हाला काही द्यायचय. दरबारचा खजिना खुला आहे. गरजेपुरतं घ्या. साऱ्यांना मिळू द्या. प्रणाम। आणि आपल्या दत्तकपुत्रास पाठीशी बांधून ती अश्वारुढ होवून निघून गेली. या युध्दात तिला वीरमरण आलं.